## निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश
## ( दिनांक ३० नोंव्हेबर, २०२२ रोजी घोषित)

मौजे पाटकुल, ता. मोहोळ येथील गट क्र. ४९५/२ मधील एकूण ० हे. ६२ आर क्षेत्रफळ असलेल्या वादीच्या मालकीच्या शेतजमिनीमध्ये वादीला जाण्या–येण्यासाठी जुना तारापूर रस्त्यावरुन पुढे शेतजमीन गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा १२ फूट रुंद असलेल्या वादग्रस्त रस्त्याने वादीला त्याच्या शेतजमिनीमध्ये जाण्यापासून व सदर रस्त्याचा वापर करण्यापासून प्रतिवादींनी स्वतः किंवा इतरांमार्फत हरकत व अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादींविरुध्द पारीत करण्याकरिता वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९, नियम १ प्रमाणे प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जाचे, प्रतिवादी क्र. १ ते ९ तर्फे निशाणी क्रमांक १४ वर दाखल केलेल्या म्हणण्याचे आणि वादी व प्रतिवादींतर्फे अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. वाय. पाटील व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. पी. एस. कुंभार यांचा युक्तिवाद ऐकला. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १० ते १३ यांना समन्सची व नोटिसची बजावणी होऊन देखील ते दाव्यात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द दावा व प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

०३. वादीचे विधिज्ञ श्री. आर. वाय. पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये वर्णन केलेल्या शेतजमिनी वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित, खरेदी मालकीच्या जमिनी आहेत. सदर जमिनींच्या सर्वे नंबरच्या बांधावरुन मूळ मालकांनी, वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वजांनी दोघांचे निम्मे–निम्मे क्षेत्र सोडून गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व गट क्र. ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा रस्ता शेतजमीन मशागत, वहिवाट करण्यास व शेतमालाची ने–आण करण्यासाठी रस्ता ठेवलेला होता व आहे.

०४. वादीच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तिवाद केला की, वादी त्याच्या मालकीच्या शेतजमिनीमध्ये जाण्या–येण्यासाठी जुना तारापूर रस्त्यावरुन पुढे शेतजमीन गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा १२ फूट रुंद असलेल्या वादग्रस्त रस्त्याने गट क्र. ४९५/२ पैकी ० हे. ६२ आर मिळकतीपर्यंत रस्ता वहिवाट करीत आलेले आहेत. सदर रस्त्याने वादीची पूर्वीपासून शांततामयरित्या वहिवाट चालू होती व आहे.

०५. युक्तिवादादरम्यान वादीच्या विधिज्ञांनी पुढे असे कथन केले की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी भूमी अभिलेख, मोहोळ यांच्याकडे मोजणीसाठी अर्ज करुन सदर जमिनी मोजून घेतल्या असता सदर वादग्रस्त रस्त्यापैकी एक चाकोरी प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या शेतातून आहे तर एक चाकोरी वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या शेतातून असल्याच्या मोजणीच्या हद्दीखुणा झाल्या. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदर मोजणीच्या हद्दीखुणाप्रमाणे त्यांच्या शेतालगतचा रस्ता दगड, काटाड्या टाकून अडविलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याबरोबर प्रतिवादी क्र. ३ ते १३ यांनीही सदर रस्ता दगड टाकून अडविलेला आहे. त्यामुळे वादीस त्याची जमीन कसण्यास, मेहनत मशागत करण्यास, शेतमालाची ने–आण करण्यास हरकत अडथळा होत आहे. वादीच्या शेताच्या पश्चिमेस मोठा ओढा असल्यामुळे व पूर्वेकडे जाणारा पुर्वापार वहिवाटीचा रस्ता प्रतिवादींनी अडविल्यामुळे वादीला त्याच्या शेतात जाणे अवघड झाले आहे.

०६. युक्तिवादादरम्यान वादीच्या विधिज्ञांनी पुढे असे कथन केले की, दिनांक ०५/१०/२०२२ रोजीपासून वादीच्या वाईटावरील लोकांच्या सांगण्यावरुन प्रतिवादी हे त्यांच्या मालकीच्या शेतजमिनीच्या दक्षिण दिशेस व उत्तर दिशेस असलेल्या पूर्व–पश्चिम चालीच्या १२ फूट रुंदीच्या रस्त्यावर दाव्यासोबत जोडलेल्या कच्च्या नकाशात लाल रंगाने दर्शविलेल्या ठिकाणी वादीस बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने हरकत, अडथळा करु लागले आहेत. त्याबाबत वादीने स्वतः व मध्यस्थांमार्फत प्रतिवादी यांना समजावून सांगूनही प्रतिवादी हे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. तसेच दिनांक

०५/१०/२०२२ रोजीपासून रस्त्यावर काटाड्या टाकणे, वादीचा रस्ता नांगरुन टाकणे, रस्त्यावर पाणी सांडणे, रस्त्यावर पिकांची लागवड करणे इत्यादी प्रकारे वादी सदर रस्त्याची वहिवाट करु नये म्हणून प्रतिवादी हरकत अडथळा करुन दमदाटी करु लागले आहेत. त्यामुळे वादीस प्रतिवादींच्या मालकीच्या जमिनींमधून शांततामयरित्या रस्ता वहिवाट करणे अशक्य झाले आहे.

०७. वादीने स्वतः व इतर मध्यस्थांमार्फत प्रतिवादींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी देखील प्रतिवादींनी वादीच्या सदर रस्त्याच्या वापरास हरकत अडथळा करणे थांबविले नाही. म्हणून शेवटी वादीला प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दावा व तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश मिळण्याकरिता प्रस्तुत अर्ज दाखल करावा लागला. अशा परिस्थितीत वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तिक आहे. अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने आहे. तसेच वादीच्या विनंतीनुसार प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे वादीच्या शेतजमिनीमध्ये वादीस जाण्या–येण्यास व सदर रस्त्याचा वापर करण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश प्रतिवादींविरुध्द देणे आवश्यक आहे. करिता वादीच्या विधिज्ञांनी प्रस्तुत तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०८. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी निशाणी क्रमांक १४ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन वादपत्रातील वादीचे कथन नाकारले. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचे विधिज्ञ श्री. पी. एस. कुंभार यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या जमिनीलगत दक्षिणेची जमीन गट क्र. ४९५/२ ही वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या कुटुंबाची असून वादी व प्रतिवादी यांच्या जमिनी जुना तारापूर रस्त्यालगत पश्चिमेकडे आहेत. वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या जमिनींचा मूळ गट क्र. ४९५ असून सदर जमिनींचे मूळ मालक रामचंद्र दौला गावडे होते. त्यांना व त्यांच्यानंतरच्या खरेदीदार मालकांना प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या जमिनींतून जाण्या–येण्याची वहिवाट नव्हती. कारण जमीन गट क्र. ४९५ ही तारापूर रस्त्यावर असल्यामुळे

त्यांना रस्त्याची गरज नाही. वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या जमिनींचा गट क्र. ४९५ हा अखंड असल्यामुळे वादीला प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या जमिनीतील खाजगी रस्त्याचा हक्क सांगण्याचा अधिकार नव्हता व नाही.

०९. युक्तिवादादरम्यान प्रतिवादींच्या विधिज्ञांनी पुढे असे कथन केले की, प्रतिवादी क्र. १० ते १३ यांनी वादीला पुढे करुन वादीला चिथावणी देऊन प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्याविरुध्द त्यांच्या जमिनींतील खाजगी रस्त्यावर खोटा हक्क असल्याचे दर्शविण्याकरिता प्रस्तुत खोटा दावा व तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला. दाव्यामध्ये व तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये नमूद केलेला रस्ता प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या जमिनी म्हणजेच गट क्र. ५०६/२ व ५०७ मधून जाणारा खाजगी रस्ता असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ९ शिवाय कोणाचाही त्या रस्त्यावर हक्क अथवा अधिकार नाही. अशी वस्तुस्थिती असताना वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांची जमीन रस्त्याकामी जाऊ नये व त्यांचे नुकसान होऊ नये व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या जमिनीतील खाजगी रस्ता वापरायला मिळावा या दुष्ट हेतूने प्रतिवादी क्र. १० ते १३ यांनी संगनमत करुन वादीला पुढे करुन खोटा दावा व प्रस्तुत तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे.

१०. युक्तिवादादरम्यान प्रतिवादींच्या विधिज्ञांनी पुढे असे कथन केले की, अशा परिस्थितीत वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तिक नाही. अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने नाही. तसेच वादीच्या विनंतीनुसार प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही, उलट प्रतिवादींचेच नुकसान होईल. करिता प्रतिवादींच्या विधिज्ञांनी प्रस्तुत तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज खर्चासहित नामंजूर करण्याची विनंती केली.

११. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांच्या उपरोक्त कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. सदर मुद्दयांवर खालील कारणमिमांसेसह मी

माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तिक आहे काय ? | नकारार्थी. |
| २ | वादीच्या बाजूने अनुकूलतेचा कल आहे काय ? | नकारार्थी. |
| ३ | वादीच्या विनंतीप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता –

१२. वादीच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वजांनी दोघांचे निम्मे–निम्मे क्षेत्र सोडून गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व गट क्र. ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा १२ रुंदीचा रस्ता शेतजमीन मशागत, वहिवाट करण्यास व शेतमालाची ने–आण करण्यासाठी रस्ता ठेवलेला होता व आहे. परंतु, सदर रस्त्याचा वापर करण्यास वादीला प्रतिवादी हरकत अडथळा करीत आहेत. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या कथनाप्रमाणे सदर रस्ता त्यांच्या शेतजमिनीमध्ये असून सदर रस्ता हा त्यांचा खाजगी रस्ता आहे.

१३. या ठिकाणी महत्वाची बाब नमूद करावीशी वाटते की, एकीकडे वादीने वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये वर्णन केलेल्या शेतजमिनी वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित, खरेदी मालकीच्या जमिनी आहेत. सदर जमिनींच्या सर्वे नंबरच्या बांधावरुन मूळ

मालकांनी, वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वजांनी दोघांचे निम्मे–निम्मे क्षेत्र सोडून गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व गट क्र. ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा रस्ता शेतजमीन मशागत, वहिवाट करण्यास व शेतमालाची ने–आण करण्यासाठी रस्ता ठेवलेला होता व आहे. तर दुसरीकडे वादीने वादपत्राच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये स्पष्टपणे नमूद केले की, वादीस **प्रतिवादींच्या मालकीच्या जमिनींमधून शांततामयरित्या रस्ता** वहिवाट करणे अशक्य व त्रासाचे झाले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, सदर वादग्रस्त रस्ता प्रतिवादींच्या मालकींच्या जमिनींमध्ये असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या कथनाप्रमाणे सदर रस्ता हा त्यांचा खाजगी रस्ता आहे.

१४. या ठिकाणी आणखी एक महत्वाची बाब नमूद करावीशी वाटते की, वादीने वादपत्रामध्ये असे कोठेही नमूद केले नाही की, सदर १२ फूट रुंदीचा वादग्रस्त रस्ता हा सरकारी रस्ता असल्यामुळे वादीला त्याच्या जमिनीमध्ये सदर रस्त्याने जाण्या–येण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे वादीने दाव्यासोबत सदर वादग्रस्त रस्ता दर्शविण्याकरिता केवळ कच्चा नकाशा दाखल केला. सदर रस्ता सरकारी रस्ता असल्याचे दर्शविण्याकरिता वादीने भूमी अभिलेख कार्यालयाचा कोणताही अधिकृत नकाशा दाखल केला नाही. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी मौजे पाटकुल येथील गट क्र. ४९४ व ४९५ च्या नकाशाची मोहोळ भूमी अभिलेख कार्यालयाकडून प्राप्त केलेली प्रमाणित नक्कल दाखल केली आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट दिसून येते की, सदर नकाशामध्ये वादीच्या कथनाप्रमाणे गट क्र. ५०६/२ व गट क्र. ५०७ च्या दक्षिण बाजूने व गट क्र. ४९५/१ व ४९५/२ च्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम चालीचा १२ फूट रुंदीचा कोणताही सरकारी रस्ता असल्याचे दर्शविले नाही.

१५. त्याचप्रमाणे सदर वादग्रस्त रस्ता असल्याचे दर्शविण्याकरिता वादीने दिनांक ३१/०७/१९९८ रोजीच्या खरेदीखताची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल

केलेली आहे. वादीच्या विधिज्ञांनी युक्तिवादादरम्यान असे कथन केले की, सदर खरेदीखताच्या पृष्ठ क्र. ७ वर असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, गट क्र. ५०६/२ च्या दक्षिण दिशेस पूर्व–पश्चिम असा गाडी रस्ता सोडलेला आहे व तो रस्ता सर्वांसाठी कायम राहण्याचा आहे. परंतु या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की, सदर खरेदीखत प्रतिवादी क्र. १ ने दिगंबर मच्छींद्र वसेकर यांच्या हक्कात करुन दिलेले आहे. सदर खरेदीखत वादीच्या हक्कामध्ये करुन दिलेले नाही. तसेच सदर खरेदीखतामध्ये असे कोठेही नमूद केलेले नाही की, सदर गाडी रस्ता हा गट क्र. ४९५/१ व गट क्र. ४९५/२ मधील जमीनधारकांच्या वापराकरिता उपलब्ध असेल.

१६. वादीच्या कथनाप्रमाणे जर वादीला त्याच्या शेतजमिनीमध्ये जाण्या–येण्याकरिता कोणताही रस्ता नसेल तर वादीने त्याच्या शेतजमिनीमध्ये जाण्या–येण्याकरिता रस्ता मिळण्याकरिता मामलातदार कोर्ट अधिनियमांच्या तरतुदीअन्वये मामलातदार यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक होते. परंतु वादीने तसे न करता प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दावा दाखल केला आहे. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे स्पष्टपणे दिसून येते की, वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तिक असल्याचे, अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने असल्याचे तसेच प्रस्तुत तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल या सर्व बाबी वादीच्यावतीने प्रथमदर्शनी सिध्द केल्या नाहीत. करिता मी मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करिता –**

मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. म्हणून खालीलप्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

०१. वादीचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

०२. खर्चाविषयी कोणताही आदेश नाही.

Digitally signed by SACHIN WAMANRAO THOMBRE
DN: cn=SACHIN WAMANRAO THOMBRE, ou=BOMBAY HIGH COURT, o=BOMBAY HIGH COURT, st=MAHARASHTRA, c=IN
Date: 2022.12.01 19:25:40 +0530

( सचिन वा. ठोंबरे )

दिनांक – ३०/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मोहोळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. K. Torane |
| Court | : | Civil Judge J.D.,Mohol. |
| Date | : | 30-11-2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 30-11-2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 01-12-2022 |

……………………………………………………………………………………